**महाराष्ट्र शासन**
सहसंचालक (उच्च शिक्षण)
१७ आंबेडकर रोड, कॅम्प, पुणे – ४११ ००१
Website: www.jdhepune.org E-mail – jdhepune@gmail.com

दूरध्वनी क्रमांक – ०२० - २६१२७८३३, ०२०-२६०५१६३२ फॅक्स क्र. ०२०- २६०५१६३२

क्रमांक -ससं/उशि/नवमतदार नोंदणी अभियान/पुवि/२०२४/7095 दि. १७/१०/२०२४

**महत्वाचे / निवडणूक**

प्रति,

१. कुलसचिव, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे.
२. कुलसचिव, सर्व विद्यापीठे, पुणे विभाग,
३. प्राचार्य / प्राचार्या,
सर्व अशासकीय अनुदानित /कायम विनाअनुदानित कला, वाणिज्य, विज्ञान,
विधी व शिक्षणशास्त्र महाविद्यालये,
**पुणे विभाग.**

विषय - **नवमतदार नोंदणी अभियानातंर्गत मतदार नांव नोंदणीबाबत..**

उपरोक्त विषय व संदर्भान्वये कळविण्यात येते की, सर्व विद्यापीठे तसेच महाविद्यालयांमध्ये नवमतदार नोंदणी अभियान राबविण्यात येत आहे. सदर नवमतदार नोंदणी अभियानांतर्गत बहुतांश मतदारांनी नांव नोंदणी केलेली आहे. तथापि आपल्या विद्यापीठातील व महाविद्यालयातील ज्या विद्यार्थ्यांनी अद्यापही मतदार नोंदणी केली नसेल त्यांना **दिनांक १९ ऑक्टोबर, २०२४** पर्यंत नवमतदार नोंदणी करता येणार आहे. त्यामुळे आपल्या विद्यापीठांमध्ये व महाविद्यालयांमध्ये ज्या विद्यार्थ्यांनी अद्याप मतदार यादीमध्ये नांव नोंदविलेले नाही अशा सर्व विद्यार्थी / विद्यार्थीनींना सूचना काढून त्यांना तात्काळ मतदार नोंदणी करण्यासाठी सूचित करावे तसेच याकरिता काही निवडक प्राध्यापकांना या अभियानांमध्ये भाग घेण्यासाठी व विद्यार्थ्यांना मदत करण्यासाठी आदेशित करण्यात यावे.

१. मतदार यादीत नांव नोंदविण्यासाठी https://voters.eci.gov.in या संकेतस्थळाला भेट दयावी.
२. "माय व्होटर ॲप" द्वारेही मतदार नोंदणी करता येते.
३. नवीन मतदारासाठी अर्ज क्रमांक ६ भरावा.
४. मतदार संघ बदल्यासाठी किंवा नाव वगळण्यासाठी अर्ज क्रमांक ७ भरावा
५. दुरुस्तीसाठी अर्ज क्रमांक ८ भरावा.

(डॉ. अशोक उबाळे)
सहसंचालक (उच्च शिक्षण)
पुणे विभाग, पुणे १

प्रत - मा. जिल्हाधिकारी, पुणे यांना माहितीसाठी सविनय सादर.